नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०२/२०२५ (शुक्रवार) संध्याकाळ**

---

## सराईत गुन्हेगार साहील उर्फ बुटऱ्या कैलास बागडे याला एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन खापरखेडा अंतर्गत राहणारा सराईत आरोपी नामे साहील उर्फ बुटऱ्या कैलास बागडे, वय २२ वर्षे, रा वार्ड क्र २ ,खापरखेडा हा खापरखेडा परीसरात गुंडगिरी करून खुनाचा प्रयत्न, दुखापत,गैरकायदयाची मंडळी जमविणे,दुखापत,अवैध शस्त्रे बाळगणे, जुगार, अवैध दारू, चोरी या सारखे अनेक शरीरा विरूध्द तसेच मालमत्ते विरूध्दचे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे.त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. परंतु आरोपी नामे साहील उर्फ बुटऱ्या कैलास बागडे, वय २२ वर्षे, रा वार्ड क्र २,खापरखेडा याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे.परंतु  आरोपी नामे साहील उर्फ बुटऱ्या कैलास बागडे, वय २२ वर्षे, रा वार्ड क्र २,खापरखेडा याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली खापरखेडा पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक २०/०२/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार साहील उर्फ बुटऱ्या कैलास बागडे, वय २२ वर्षे, रा. वार्ड क्र २, खापरखेडा याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता खापरखेडा पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर